

राजे!
सलाम
तुमच्या
कर्तृत्वाला...

छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मृतीदिनानिमित दै.मूलनिवासी नायक परिवारातर्फे विनम्र अभिवादन

संघर्षासाठी
# मूलनिवासी भारत

व्यवस्था परिवर्तनासाठी समर्पित मराठी साप्ताहिक...

नागपूर | वर्ष : १३ वे, अंक २५ | संपादक : वामन चिंधूजी मेश्राम | रविवार, दिनांक ११ मार्च, २०१८ | पृष्ठ : ८, मूल्य : ४ रू.


# देशभरात ‘ईव्हीएम तोडो’ अभियान राबविणार

## बामसेफ, भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांचा भाजपा व निवडणूक आयोगाला इशारा

**बदायू (उ.प्र.) । मूलनिवासी प्रतिनिधी**

ईव्हीएममध्ये घोटाळा करुन भाजपा देशाच्या सत्तेवर आली आहे. आजही त्यांच्याकडून तेच सुरु आहे. लोकशाहीवर अनियंत्रित सत्ता प्राप्त करुन मूलनिवासी बहुजन समाजाला गुलाम बनविण्याचे षड्‌यंत्र सुरू आहे. त्यामुळे २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी ईव्हीएम विरोधात रणनिती आखून देशभरात ‘ईव्हीएम तोडो’ अभियान राबविणार असल्याचा इशारा बामसेफ, भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांनी भाजपा व निवडणूक आयोगाला दिला.

उत्तर प्रदेश बदायू येथील मिशन कंपाऊंड येथे आयोजित राष्ट्रीय किसान मोर्चाच्या अधिवेशनात ते अध्यक्ष स्थानावरुन बोलत होते. या अधिवेशनाचे उद्‌घाटन शेतकरी नेते सर्वेश सिंह पटेल यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय किसान मोर्चाचे प्रभारी रामसुरेश वर्मा उपस्थित होते.

यावेळी वामन मेश्राम यांनी भाजपा व निवडणूक आयोगावर चांगलेच तोंडसुख घेतले. या लोकशाही देशात घोटाळ्यांची कमी नाही. मॅच फिक्सींगबरोबर आता ईव्हीएम फिक्सींगही केले जात आहे. ईव्हीएममध्ये घोटाळा करुन केंद्रासहीत अन्य राज्यांमध्ये भाजपा सरकार बनवित आहे. बेईमानी करुन भाजप निवडून येत आहे.

कथित स्वातंत्र्यानंतर आजही आम्ही गुलाम आहोत. ईव्हीएमच्या माध्यमातून ब्राह्मणवादी व्यवस्था आणखी आम्हाला गुलामीच्या खाईत लोटत आहे. अमेरिका, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंडसारख्या देशांनी ईव्हीएमचा पर्याय निवडला. परंतु कोट्यवधी रुपये खर्च करुनही त्याचा काही फायदा झाला नाही. या ईव्हीएमच्या धोक्यापासून वाचण्यासाठी ईव्हीएमवर कोट्यवधी रुपये खर्च करुनही त्यांनी त्या फेकून दिल्या. ईव्हीएम असंविधानिक असल्याचे घोषित केले. परंतु भारतामध्ये ईव्हीएमला मान्यता देण्यात आली आहे. कारण ईव्हीएमच्या माध्यमातून सत्तेमध्ये येऊन मूलनिवासी बहुजनांना गुलाम करण्याचे षड्‌यंत्र आखण्यात आले आहे. म्हणून भारतामध्ये ईव्हीएमऐवजी मतपेटीद्वारे निवडणूक होण्याची गरज आहे.

मेश्राम यांनी मंडल आयोगावरही प्रकाशझोत टाकला. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर १९५० मध्ये कायदामंत्री बनले. १९४३ मध्ये त्यांनी एससीसाठी ८.५ टक्के आरक्षणाची तरतूद केली. २१ सप्टेंबर १९४७ ला एससीसाठी १२.५ तर १३ सप्टेंबर १९५० ला एसटीसाठी ५ टक्के आरक्षणाची व्यवस्था केली. तसेच १९७० पासून एससीसाठी १५ टक्के आणि एसटीसाठी ७.५ टक्के आरक्षण लागू झाले.

डॉ.आंबेडकरांनी ओबीसींसाठी ३४० व्या कलमांची निर्मिती केली. परंतु त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे १९५१ मध्ये कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर २९ जानेवारी १९५३ ला ओबीसींसाठी काकासाहेब कालेलकर आयोगाची घोषणा करण्यात आली. कालेलकर आयोगाने २३९९ ओबीसींच्या जाती तर ८३७ अतिमागास जाती असल्याचे सूचित केले. तसा अहवाल ३० मार्च १९५५ मध्ये केंद्र सरकारकडे देण्यात आला. परंतु कालेलकर आयोग लागू करण्यासाठी नेहरु सरकारने विरोध केला. पुन्हा २० सप्टेंबर १९७८ मध्ये बिंदेश्वरी प्रसाद मंडल यांच्या नेतृत्वाखाली मंडल आयोगाची घोषणा करण्यात आली. या आयोगाचा अहवाल सप्टेंबर १९८० मध्ये सरकारला देण्यात आला. परंतु याची अंमलबजावणी झाली नाही. १९९१ मध्ये व्ही.पी.सिंह प्रधानमंत्री असताना मंडल आयोग काही प्रमाणात लागू करण्यात आला. दरम्यान १६ नोव्हेंबर १९९२ ला सर्वोच्च न्यायालयातील ९ न्यायाधिशांनी आरक्षण विरोधात निकाल दिला. ओबीसींचा हा मौलिक अधिकार संपविण्यासाठी षड्‌यंत्र रचले गेले. ओबीसींना २७.५ टक्के आरक्षण देताना क्रिमिलेयरची अट लादण्यात आली. एका बाजूला आरक्षण देताना दुसऱ्या बाजूला ते हिसकावून घेण्यात आले. त्यामुळे ओबीसींची आज वाताहात झाल्याचे मेश्राम यांनी सांगितले.



### मतपेटीद्वारे निवडणूक घेण्याचे भाजपला आव्हान

या देशात ईव्हीएमशिवाय मतपेटीद्वारे निवडणूक घेतल्यास भाजप कधीही सत्तेवर येऊ शकत नाही. निवडणूक आयोग व भाजपाने मतपेटीद्वारे निवडणूक घ्यावी, असे त्यांना माझे खुले आव्हान आहे. परंतु हे आव्हान ते स्विकारणार नाहीत. कारण त्यांना पुन्हा एकदा ईव्हीएममध्ये घोटाळा करायचा आहे.

### गांधीने केला ओबीसींचा घात

अनुसूची तयार न झाल्यामुळे ओबीसीं-साठी आरक्षण लागू झाले नाही. कारण ओबीसींनी मोहनदास करमचंद गांधीला आपला नेता मानले. ओबीसींना हक्क देण्यासाठी आलेल्या सायमन कमशीनला गांधींनी विरोध केला. त्यामुळे ओबीसींचा घात झाला.

# गोऱ्या लोकांकडे असलेली जमीन मूलनिवासींना मिळणार

**जोहांसबर्ग । मूलनिवासी वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिका सरकारने एक मोठा ऐतिहासिक निर्णय घेत विदेशी गोऱ्या लोकांकडून जमिनी हिसकावून स्थानिक मूलनिवासीयांना देण्यासंबंधित एक विधेयक पारित केलेले आहे. सदर विधेयक पारित झाल्यानंतर आता कुठलीही नुकसान भरपाई न देता गोऱ्या लोकांकडे असलेली जमीन हिसकून दक्षिण आफ्रिकेतील मूलनिवासी लोकांना दिली जाऊ शकेल. मीडिया रिपोर्टच्या अनुसार हे विधेयक विरोधी पक्ष इकॉनॉमिक क्रिडम पक्षाचे नेते जुलियस मालेमा यांनी सादर केले होते. सत्ताधारी

### दक्षिण आफ्रिकेत विधेयकास मंजूरी



आफ्रिकन नॅशनल काँग्रेस या पक्षाने या विधेयकाचे समर्थन केले आहे.

जेव्हा हे विधेयक संसदेत ठेवले गेले तेव्हा या विधेयकाच्या समर्थनात २४१ मते पडली तर विरोधात ८३ मते पडली. विरोधी पक्ष इकॉनॉमिक क्रिडम पार्टीचे नेते जुलियस मालेमाद्वारे प्रस्तावित विधेयकानुसार ज्या लोकांची जमीन हिसकावून घेतली जाईल त्या लोकांना नुकसान भरपाई देण्याची तरतूद नाही. या विधेयकाचे सत्ताधारी पक्षानेही समर्थन केले आहेत. ज्यांच्याकडे संसदेचे दोन ततियांश समर्थन आहे. केवळ एक विरोध पक्ष असलेल्या डेमोक्रॉटिक अलायंसने यास विरोध केला आहे.

ज्याप्रकारे दक्षिण आफ्रिकेसाठी गोरे लोक विदेशी आहेत, त्याचप्रकारे भारतीय लोकांसाठी ब्राह्मण लोक विदेशी आहेत. ही बाब स्वत: डीएनए संशोधनातून समोर आ-लेली आहे. मात्र भारतात त्यांचीच सत्ता व एकाधिकारशाही असल्याने संपूर्ण व्यवस्थेवर अनियंत्रित नियंत्रण आहे. इतकेच नाही तर विरोधी पक्षही त्याच लोकांचा आहे. त्यामुळे भारत सरकार दक्षिण आफ्रिका सरकारप्रमाणे विधेयक सादर करणार नाही किंवा कायदा बनवणार नाही. त्यासाठी आता एससी, एसटी, ओबीसी भटके विमुक्त आणि धर्मपरिवर्तीत अल्पसंख्याक अशा ८५ टक्के लोकांनी एकत्र येऊन दक्षिण आफ्रिका सरकारप्रमाणे कायदा बनविण्यासाठी भारत सरकारवर दडपण टाकावे अशी चर्चा सुरु आहे.



# विदेशी (गोरे) युरेशियन ब्राम्हण भारतातील मूलनिवासींनाच देशोधडीला लावताहेत

दक्षिण आफ्रिकेने एक मोठा ऐतिहासिक निर्णय घेत विदेशी गोऱ्या लोकांनी हस्तगत केलेल्या जमिनी मूलनिवासींना देण्यासंबंधी एक विधेयक पारित केले आहे. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेत बेदखल झालेल्या मूलनिवासींना न्याय मिळाला आहे. ही बातमी वाचल्यानंतर माझ्या मनात एक वेगळाच विचार आला तो म्हणजे नेमकं याच्या परस्परविरोधी काम भारतात सुरू आहे. कारण भारतातील मूलनिवासी लोकांनाच देशोधडीला लावण्याचे काम भारतावर आक्रमण केलेल्या विदेशी (गोरे) युरेशियन ब्राम्हणांनी सुरू ठेवले आहे.

दक्षिण आफ्रिका देशात खरी क्रांती कुणी केली असेल तर तत्कालिन राष्ट्राध्यक्ष नेल्सन मंडेला यांनी! त्यांनीच तेथील मूलनिवासींना हक्काची जाणीव करून दिली. म्हणून मंडेला यांच्या नेतृत्वाखाली तेथे मोठी आंदोलने झाली. त्या आंदोलनातूनच मंडेला यांना सत्ता हस्तगत करण्यात यश आले. आता तर तेथील गोऱ्या लोकांनी ज्या मूलनिवासींच्या जमिनी हस्तगत केल्या आहेत, त्या जमिनी मूलनिवासींना देण्याचे विधेयकच पारित केले आहे. एवढा मोठा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. भारतात अशा प्रकारचा चुकून निर्णय झालाच तर देशातील सर्व युरेशियन ब्राम्हण आकाश पाताळ एक करुन त्या निर्णयाला प्राणपणाने विरोध करतील.

ब्रिटिशांनी भारताची सत्ता युरेशियन ब्राह्मणांच्या हातात दिली. म्हणजे सत्तेचे हस्तांतरण झाले. जवाहरलाल नेहरु निवडणूक न लढविता पहिले प्रधानमंत्री झाले. १५ ऑगस्ट १९४७ नंतर शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नावर ब्राह्मणांच्या सरकारने विचार करणे भाग होते. परंतु शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कुठलाही कायदा केला नाही. म्हणून विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि लोकनेते आप्पासाहेब नारायण नागू पाटील यांनी आंदोलन केले. यामुळे १९४८ ला नवा कुळ कायदा करावा लागला. या कायद्याने कुळांची नावे ७/१२ च्या उताऱ्यात नोंदणी केली. कुळांना जमिनी कसण्याचा कायदेशीर हक्क मिळाला. मुंबई खोती निर्मूलन कायद्याची अंमलबजावणी १ मे १९४९ मध्ये झाली. या सर्व गोष्टींची पूर्तता व्हायला १९५७ साल उजाडले. ब्राह्मणांची खोती नष्ट झाली. मूलनिवासी लोक जमिनीचे मालक झाले. याचा फायदा शेतकऱ्यांना झाला. कारण संपूर्ण देशात कसेल त्याची जमीन हा कायदा तयार झाला. १ एप्रिल १९५७ पासून मुंबई कुळ वहिवाट कसेल त्याची जमीन अधिनियम लागू करण्यात आला. हा कायदा नंतरच्या काळात देशातील सर्व राज्यांमध्ये लागू झाला.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मूलनिवासी शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. संविधानाच्या माध्यमातून भारतातील प्रत्येक नागरिकास त्याचे मूलभूत अधिकार दिले. संविधानाच्या माध्यमातून स्वतंत्र झालो आहोत, असे आपण म्हटले तरी जे लोक संविधानावर अंमलबजावणी करतात ते लोक १०० टक्के युरेशियन ब्राह्मण आहेत. शासन, प्रशासन, न्यायपालिका व प्रसार माध्यमे या चारही स्तंभांवर त्यांचे निरंकुश वर्चस्व आहे. १९९० च्या दशकात तत्कालीन प्रधानमंत्री पी.व्ही.नरसिंहराव यांच्या कालखंडात एलपीजी (उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण) लागू करण्यात आले. एलपीजीच्या नावाखाली भारतातील मूलनिवासी समाजाला देशोधडीला लावण्याचे काम सुरु आहे. शिक्षणाचे बाजारीकरण, नोकऱ्यांचे खाजगीकरण, जागा, जमिनीचे खाजगीकरण असे खतरनाक कायदे संसदेमध्ये चर्चा न करता पास केले गेले. खाजगीकरण जगामध्ये सर्व ठिकाणी होत आहे, परंतु भारतामध्ये जे खाजगीकरण होत आहे हे राष्ट्रीय संपत्ती लूटण्याचा कार्यक्रम आहे. १९९० पासून ते २०११ पर्यंत १७१० कंपन्याचे खाजगीकरण करण्यात आले आहे. भारतीय संविधान कलम क्रमांक १३ मध्ये लिहिले आहे की, संसदेला कुठलाही असा कायदा बनविण्याचा अधिकार नाही की ज्यामध्ये नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होईल. परंतु २३ जून २००५ मध्ये सेझ (एसईझेड) सारखा काळा कायदा बनवून १० फेब्रुवारी २००६ पासून भारतामध्ये लागू करण्यात आला. सेझच्या संदर्भात संसदेत चर्चाही झाली नाही. सेझमध्ये अशी तरतूद आहे की सेझसाठी खरेदी केलेली जमीन विदेशी भांडवलदारांना हस्तांतरीत करण्यात येईल. त्यामध्ये जो विकास होईल त्याला भारतीय संविधान लागू होणार नाही. भारतामधीलच तो एक विदेशी भूभाग (Foreign Territory) असे समजण्यात यईल. हे भयानक युरेशियन ब्राह्मणांचे षड्यंत्र आहे. जवळजवळ संपूर्ण भारतात ५५०० सेझ प्रकल्प ब्राह्मणी सरकार २०२० पर्यंत भारतामध्ये लागू करेल यालाच युरेशियन ब्राह्मण आज भारताला आर्थिक महासत्ता असे म्हणतात.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि लोकनेते अप्पासाहेब नारायण नागू पाटील यांनी ब्राह्मणी खोती पद्धती नष्ट करुन मूलनिवासी भारतीय समाजाच्या नावावर जमिनी केल्या. त्यांना जमिनीचे मालक केले. खोतांच्या ढुंगणावर लाथ मारली. ब्राह्मणी सत्ता उलथवून टाकली. मूलनिवासींना शिक्षण, संपत्ती व लढण्याचा अधिकार मिळाल्याने ते ब्राह्मणांना सहन झाले नाही. म्हणून ब्राह्मणांनी सेझची निर्मिती करुन भारतातील सुपीक जमीन घेण्याचा कार्यक्रम सुरु केला. सीएमझेडच्या कायद्यामुळे समुद्र किनाऱ्यावरील कोळी समाजाच्या जमिनी घेण्याचा कार्यक्रम सुरु आहे. एसटीझेडच्या नावाखाली जंगलामध्ये राहणाऱ्या आदिवासींच्या जमिनी लाटण्याचे सत्र सुरु आहे.


**दिलीप बाईत**

मो.९२७०९६२६९८


सेनगुप्ता कमिटीच्या अहवालात सांगण्यात आले आहे की, आज मूलनिवासी भारतीय समाजातील ८३ कोटी लोकांचे दिवसाचे उत्पन्न २० रुपये आहे. १२.५ कोटी युवक बेराजगार आहेत. १६ कोटी लोक झोपडपट्टीत राहतात. २५ टक्के लोकांना प्यायला पाणीही मिळत नाही. ४५ लाख लोकांना आजही भीक मागावी लागते. २० कोटी ८५ लाख लोक भूकबळी आहेत. महिला सुरक्षित नाही. अशा अनेक भयानक समस्याने थैमान घातले आहे. भारत ३४ लाख ९५ हजार १५२ कोटी रुपयांनी कर्जबाजारी आहे. या कर्जामुळे १९ टक्के व्याज दरवर्षी जगातील बँकांना देण्यात येत आहे. हे व्याज देण्यासाठी मूलनिवासी भारतीयांवर महागाई लादली जात आहे. ब्रिटीश सरकार असताना १८ टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत होते. परंतु तथाकथित स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतातील दारिद्र्य रेषा कमी न होता ती ६५ टक्क्यांवर गेली. याला सर्वस्वी युरेशियन ब्राह्मणी सरकार जबाबदार आहे.

दरम्यान गोऱ्यांकडे असलेल्या जमिनी मूलनिवासींना देण्याचे विधेयक दक्षिण आफ्रिकेने मंजूर केले आहे. असे विधेयक भारतामध्ये मंजूर होणार नाही. कारण भारतावर विदेशी युरेशियन ब्राह्मणांची सत्ता आहे. ब्राह्मण विदेशी असल्याचे डीएनएद्वारे सिद्ध झाले आहे. भारतातील ब्राह्मणांचा डीएनए हा युरेशियन लोकांशी ९९.९९ टक्के जुळतो. तशी बातमी टाईम्स ऑफ इंडियामध्ये २१ मे २००१ ला छापून आली होती. याबाबत अमेरिकेतील उटाह विद्यापीठातील डॉ.मायकल बामशाद यांनी संशोधन केले होते. जर का येथील जमिनी मूलनिवासींना परत दिल्या तर पुन्हा एकदा त्यांचे वर्चस्व निर्माण होईल. ही भीती ब्राह्मणांना आहे. म्हणूनच कोणीही स्वतःच्या पायावर धोंडा मारुन घेणार नाही. कारण ब्राह्मण बदमाश आणि चलाख आहेत. त्यामुळे येथील मूलनिवासी बहुजन समाजाला ब्राह्मणवाद व त्यांची नीती समजून घेत येणाऱ्या आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे.

# दारुबंदीचा निर्णय नितीश कुमारांच्या अंगलट

## दारुबंदीच्या नावाखाली हजारो लोकांना जावे लागते तुरुंगात

**पाटना । मूलनिवासी वृत्तसंस्था**

मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी बिहारमध्ये दारुबंदीचा निर्णय घेतला खरा, परंतु त्यांचा हा निर्णय आता त्यांच्याच अंलगट येत असल्याचे दिसून येत आहे. दारुबंदीच्या नावाने हजारो लोकांना तुरंगात जावे लागत असल्याने मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी राज्यात दारुबंदी केली की गरीबबंदी? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

गेल्या वर्षी शेतमजुरी करणारे मस्तान मांझी व पेंटर मांझी यांना दारु पिण्याच्या गुन्ह्यात पाच वर्षाचा कारावास आणि एक-एक लाख रुपयांचा दंड ठोठावला तेव्हा याकडे दुर्लक्ष करण्यात आले. मात्र आता हजारो लोक दारु पिण्याच्या गुन्ह्यात तुरुंगात जात आहेत. यावरुन पुन्हा एकदा मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी यावर विचार करावा अशी मागणी होत आहे.

राज्यातील महिलांनी अवश्य म्हटले असेल की दारुबंदी झाली पाहिजे, परंतु हे म्हटले नसेल की त्यांच्या पतीनां पाच-पाच



वर्षासाठी तुरुंगात बंद करावे.

५ ऑगस्ट २०१७ च्या टाईम्स ऑफ इंडियात राज्याचे मुख्य सचिवाचे वक्तव्य छापून आलेले आहे. १६ महिन्यांच्या दारुबंदी काळात ३ लाख ८८ हजारपेक्षा अधिक धाडी टाकण्यात आल्यात व दारु पिण्याच्या गुन्ह्यात ६८,५७८ लोकांना अटक करण्यात आलेली आहे. या आकडेवारीवरुन अंदाज व्यक्त होत आहे की, आतापर्यंत एक लाखपेक्षा अधिक लोकांना अटक झाली असेल. ही सामान्य बाब नाही. यापूर्वी दारु पिणारे लोक आता गुन्हेगार झाले आहेत. या लोकांना तुरुंगात ठेवण्यासाठी जागा आहे की नाही? असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

### आधी दारु विक्रेत्यांवर कारवाई करा

बिहारमध्ये ५८ तुरुंग आहेत. ज्यांची क्षमता ३२ हजार आहे. या तुरुंगामध्ये अगोदरच गर्दी असेल जर १ लाख नवीन गुन्हेगार यात सोडले तर तुरुंगांची काय अवस्था असेल. सरकारने दारु पिणाऱ्यांवर कारवाई करण्यापेक्षा दारु विकणाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे, जेणेकरुन राज्यात दारु विकलीच गेली नाही पाहिजे, अशी मागणी आता जनतेतून उपस्थित होत आहे. दारुच्या गुन्ह्यात लोकांना तुरुंगात टाकण्यापेक्षा ज्यामुळे समस्या निर्माण होत आहे ते दारुचे कारखानाचे बंद करण्यात यावेत, अशीही काही लोकांची मागणी आहे.



# भारताचा इतिहास पुन्हा लिहिण्याचा सुटला कंड

## मोदी सरकारचे भयानक षड्यंत्र, समिती बनविली

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**

भारताचा इतिहास पुन्हा लिहिण्या मोदी सरकारला कंड सुटला आहे, हे भयानक षड्यंत्र आखले आहे. त्यासाठी के.एन.दीक्षित यांच्या अध्यक्षतेखाली समिती बनविण्यात आली आहे. दरम्यान आधीच भारताचा खरा खुरा इतिहास तोडमोड करुन विकृत पद्धतीने लिहिला गेला आहे. त्यातच अशी घुसखोरी करुन पुन्हा एकदा विकृत इतिहास लोकांच्या माथी मारला जाईल. यामुळे बहुजनांनी सावध होऊन या विरोधात जनआंदोलन निर्माण करण्याची गरज आहे.

सांस्कृतिक मंत्री महेश शर्मा याबाबत म्हणाले की, समितीच्या माध्यमातून इतिहासाचे निष्कर्ष आल्यानंतर हा इतिहास शाळा व अभ्यासक्रमाचा ढाचा विद्यापीठ स्तरावर सामील करण्यात येईल. इतिहास पुनर्लेखन समितीचे अध्यक्ष के.एन.दीक्षित म्हणाले, तसा अहवाल केंद्र सरकारने पाठवायला सांगितला आहे. भारताच्या प्राचीन इतिहासाचे जे पैलू आहेत त्या पैलूवर पुन्हा एकदा लेखन करुन प्रकाशझोत टाकण्यात येणार आहे. सांस्कृतिक मंत्री महेश शर्मा यांनीही या गोष्टीला दुजोरा दिला. समितीच्या माध्यमातून भारताचा इतिहास पुन्हा लिहिण्याची एक मोठी योजना आहे. पुरातत्त्व व प्राचीन इतिहासाला साक्ष ठेवून ही समिती नवीन इतिहास लिहिणार आहे. हिंदू ही प्राचीन संकल्पना आहे आणि त्याचा वारसा



चालविणाऱ्या शास्त्रांमध्ये कुठलीही चुकीची माहिती नाही. याबाबत आरएसएसचे मनमोहन वैद्य म्हणाले, भारतीय इतिहासाचा खरा रंग भगवा आहे. सांस्कृतिक परिवर्तन आणायचे असेल तर इतिहासाचे पुन्हा लेखन झाले पाहिजे. तर आरएसएसच्या इतिहास विभागाचे प्रमुख बालमुकूंद पांडे म्हणाले, भारताच्या गौरवशाली इतिहासाचे पुन्हा लेखन करणे हीच योग्य वेळ आहे.

सरकारच्या माध्यमातून वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या १७ लोकांची एक समिती बनविलेली आहे. ही समिती १२ हजार सालापूर्वीपासून ते आत्तापर्यंत भारताचा सांस्कृतिक इतिहास आणि त्यामध्ये झालेले बदल याबाबत अभ्यास करेल. या समितीचा कार्यकाळ १ वर्षाचा राहील. दरम्यान अशा प्रकारची समिती स्थापन करण्यात आली असल्याचे मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर यांनी इन्कार केला आहे. परंतु समितीतील एका सदस्याचे म्हणणे आहे की, अशा प्रकारचा अहवाल पहिल्या टप्प्यामध्ये आहे. तो पूर्ण होण्यासाठी वेळ लागेल. ज्यावेळी इतिहास पुनर्लेखनाचा अहवाल तयार होईल, त्याचक्षणी सरकारकडे सोपविला जाईल.

# सुब्रह्मण्यम स्वामींचा गौतम अदानींवर हल्लाबोल

## सर्वात मोठा थकबाकीदार असल्याचे जाहीर करा नाही तर जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**





भाजपाचे वरिष्ठ नेते सुब्रह्मण्यम स्वामी यांनी उद्योजक गौतम अदानी यांच्यावर हल्लाबोल केला आहे. सर्वात मोठा थकबाकीदार असल्याचे जाहीर करा, नाही तर जनहित याचिका दाखल करु, असा इशारा त्यांनी दिला आहे. स्वामींनी ट्विट करुन अशातऱ्हेचा अदानी यांना इशारा दिल्यामुळे राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

दरम्यान गौतम अदानी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जवळचे मानले जातात. अदानी यांच्या कंपन्यांसाठी हजारो कोटींचे कर्ज विविध बँकांनी दिले आहे. त्यामध्ये विजवितरण, रिअल इस्टेटसारख्या उद्योगांचा समावेश आहे. ब्लुमबर्गने दिलेल्या आकडेवारीनुसार सप्टेंबर २०१७ पर्यंत अदानींच्या वीज कंपनीला (पॉवर कार्पोरेशन) ४७,६०९.४३ कोटी रुपये कर्ज रुपाने दिले आहेत. त्याचबरोबर अदानी ट्रान्समिशनला ८,३५६.०७ कोटी आणि अदानी एंटरप्राईझ कंपनीला २२,४२४.४४ कोटी तसेच अदानी पोर्टस कंपनीला २०,७९१.१५ कोटी कर्ज देण्यात आलेले आहेत. फोर्ब्सच्या माहितीनुसार २०१७ मध्ये अदानी आणि त्यांच्या परिवाराची एकूण संपत्ती ११ अरब डॉलर आहे. भारतातील सर्वात श्रीमंतांच्या यादीमध्ये अदानी १० व्या स्थानावर आहेत. अदानी यांनी कर्ज चुकते न केल्यास ते मोठे थकबाकीदार असतील. आपण थकबाकीदार असल्याचे जाहीर न केल्यास जनहित याचिका दाखल करु, असे सुब्रम्हण्यम स्वामी यांनी इशारा दिला आहे.

स्वामी यांनी केलेल्या आरोपाबाबत अदानी यांनी स्पष्ट शब्दात इन्कार करत सर्व आरोप फेटाळले आहेत. अदानी उद्योग समूहाने दीर्घ मुदतीचे कर्ज घेतले आहे. आमचा उद्योग समूह ५० टक्क्यांपेक्षा कमी बँकांच्या कर्जावर अवलंबून आहे. समूहावर ३४ हजार कोटी रुपयाचे कर्ज आहे. हे कर्ज नियमीत फेडले जात आहेत. समूहाने जागतिक स्तरावर विविध ठिकाणी मालमत्ता निर्माण केली आहे. त्याचे सर्व मूल्य १ लाख १० हजार कोटी रुपयांपेक्षाही जास्त आहे. या उद्योग समूहांकडून बंदर विकास, विजनिर्मिती, वितरण, कृषीउद्योग, गौणखनिज (खणीकर्म), सौरऊर्जा क्षेत्रात मोठमोठे प्रकल्प उभे केले आहेत. समूहामार्फत ११ हजार पेक्षा जास्त लोकांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार देण्यात आला आहे. याशिवाय देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये महत्त्वपूर्ण योगदान अदानी समूहाचे राहिले आहे.


# आठ ब्राह्मणांचे जानवे कापले

## तामिळनाडूमध्ये तणाव

**तामिळनाडू । मूलनिवासी वृत्तसंस्था**

त्रिपुरामध्ये लेनिन यांची मूर्ती तोडल्यानंतर तामिळनाडू वेल्लोरमध्ये क्रांतीकारक पेरियार रामास्वामी यांच्या मूर्तीचीही भाजप कार्यकर्त्यांनी तोडफोड केली. त्यामुळे तामिळनाडूत मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झाला आहे. दरम्यान आठ ब्राह्मणांचे जानवे कापून आठ-दहा अज्ञात लोक तेथून पसार झाले आहेत. तर कोईमबतूर भाजपा कार्यालयावर पेट्रोल बॉम्ब टाकण्यात आल्याची खबर आहे. या दोन्ही घटनांमध्ये हल्ला कोणी केला, याची माहिती पोलीस प्रशासनाकडून घेण्यात येत आहे. सीसीटीव्ही फुटेज पाहून कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत.

**पेरियार रामास्वामी मूर्ती तोडफोड**



क्रांतीकारक पेरियार रामास्वामी यांनी दक्षिण भारतामध्ये ब्राह्मणवादाविरोधात आंदोलन उभे केले. त्याला लोकांनी पाठींबा दिला. रामास्वामी यांनी द्रविड कळघम ही राजकीय पार्टी बनविली. या राजकीय पार्टीने नास्तिकता या विषयावर खुलेआमपणे प्रचार व प्रसार केला. दरम्यान तामिळनाडूतील भाजप नेते एच.राजा यांनी पेरियार रामास्वामींची मूर्ती तोडावी, अशा प्रकारची फेसबूकवर पोस्ट टाकली नसती तर अशा प्रकारची घटना घडली नसती. राजा यांच्या पोस्टमुळे वेल्लोरमधील पेरियार रामास्वामींची मूर्ती हटविण्यात आली. ते त्यांचे वैयक्तिक मत होते. त्याचा भाजपाशी काहीही संबंध नाही, असे राजा यांच्या पोस्टवर भाजपाने हात वर केले. भाजपाने इन्कार करताच ही पोस्ट काही वेळातच राजा यांनी काढून टाकली.

मूर्ती हटविण्याच्या घटना घडत असल्याने केंद्रीय गृहमंत्रालयाने याबाबत कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही ट्विट करत अशा घटना घडल्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. या घटनांमध्ये जे लोक सामील आहेत त्यांच्या विरोधात कडक कारवाई करण्याचे संकेत भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांनी दिले आहेत.



# अमित शहांना वाचविण्यासाठी सीबीआयचा आटापिटा

## चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याभोवतीच फास आवळला

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**

गुजरातमधील सोहराबुद्दीन व इशरत जहा हत्याकांड प्रकरणी भाजपचे अध्यक्ष अमित शहांना वाचविण्यासाठी सीबीआयने आटापिटा चालाविला आहे. या प्रकरणांची चौकशी करणारे आयपीएस अधिकारी संदीप तामगाडगे यांच्या भोवतीच चौकशीचा ससेमिरा लावून भ्रष्टाचाराचे खोटे प्रकरण दाखल करुन त्यांच्या भोवती फास आवळला आहे. त्यामुळे 'उलटा चोर कोतवाल को डाटे' अशी म्हणण्याची वेळ आली आहे.


२०११ ते २०१४ या कालावधीत तामगाडे यांनी सोहराबुद्दीन हत्याकांड प्रकरणी चौकशी केली होती. तर सोहराबुद्दीन हत्या प्रकरणातील मुख्य साक्षीदार तुलसी प्रजापती याचीही हत्या करण्यात आली होती. त्याचप्रमाणे इशरत जहा हत्याकांड प्रकरणाचा तपासही त्यांच्याकडे होता. त्याबाबत चार्जशीटही दाखल केली होती. यामध्ये गुजरातचे

### सोहराबुद्दीन आणि इशरत जहा हत्याकांड प्रकरण

तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहराज्यमंत्री अमित शहा यांच्या जवळचे असलेल्या काही वरिष्ठ मंत्र्यांना व पोलीस अधिकाऱ्यांना त्यांनी आरोपी बनविले होते. तसेच तामगाडगे यांनी अमित शहा यांची चौकशीही केली होती. तसेच प्रजापतीच्या हत्याकांडाप्रकरणी त्यांनीच चार्जशीट केली होती. याप्रकरणी अमित शहा यांना मुख्य आरोपी व प्रजापतीची हत्या करणाऱ्या मास्टरमाईंड विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या दोन्ही हत्याकांडमध्ये शहा यांची भूमिका संशयास्पद होती.

दरम्यान इशरत जहाच्या प्रकरणात पुराव्याअभावी शहा यांना आरोपातून मुक्त करण्यात आले होते. परंतु त्यांच्या नजीक असलेल्या अधिकाऱ्यांविरोधात अपहरण आणि हत्येचा आरोप लावण्यात आला होता. तामगाडगे यांच्यामार्फत सुरु झालेल्या चौकशीचा अहवाल सर्वोच्च न्यायालयात त्यांनी दाखल केला होता. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांनीही तामगाडगे यांच्या चौकशीवर कुठल्याही प्रकारे नाराजी व्यक्त केली नव्हती. दरम्यान २०१४ मध्ये मोदी सत्तेवर आल्यानंतर तामगाडगे यांना या हत्या प्रकरणांची चौकशी करु नये, असे सांगण्यात आले. त्यांना या चौकशी प्रकरणातून बाजूला सारण्यात आले. ज्यावेळी तामगाडगे यांना हटविण्यात आले त्यावेळी रणजित सिन्हा सीबीआयचे निर्देशक होते. ही प्रकरणे कमजोर करण्यासाठी सिन्हांकडे आता चौकशी कायम करण्यात आली आहे. त्यानंतर ३० डिसेंबर २०१४ ला सीबीआयचे एम.बी.गोसामी यांनी अमित शहा यांना या प्रकरणातून क्लिनचिट दिली. तामगाडगे यांना देण्यात आलेली सुरक्षाही काढण्यात आली. त्यानंतर त्यांना नागालँडमध्ये पाठविण्यात आले.

तामगाडगे यांना नागालँडमध्ये पाठविल्यानंतर त्यांच्या विरोधात दोन प्रकरणांचा चौकशीचा ससेमिरा लावण्यात आला. या दोन्ही प्रकरणांचा इशरत जहा व सोहराबुद्दीन हत्याकांडाशी कुठलाही संबंध नाही. परंतु तामगाडगे यांना खोट्या प्रकरणात गुंतविण्यात आले. सीबीआयमार्फत टाकण्यात आलेल्या छाप्यामध्ये जप्त केलेले किमती सामान भांडारातून लंपास करण्यात आल्याचा आरोप तामगाडगे यांच्यावर सीबीआयने केला. सुपरवायझर अधिकारी म्हणून आपल्या कामाकडे ते निष्काळजीपणे पाहत होते, असा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.



# अहो! मोदी किती शिकलेत आम्ही कशाला सांगू?

## प्रधानमंत्र्यांच्या पदवीची माहिती देण्यास दिल्ली विद्यापीठाचा नकार

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पदवीवरुन वाद निर्माण झाला होता. त्यानुसार केंद्रीय माहिती आयोगाने १९७८ मधील बीएचे संपूर्ण रेकॉर्डची पडताळणी करण्याचे निर्देश दिले होते. मात्र मोदी किती शिकले आहेत, याची माहिती आम्ही देऊ शकत नाही. कारण विद्यार्थ्यांप्रती एक विश्वासार्हता आहे. त्यामुळे ती विश्वासार्हता आम्हाला ढळू द्यायची नाही, असे सांगत दिल्ली विद्या-पीठाने माहिती देण्यास चक्क नकार दिला.

बुधवारला दिल्ली उच्च न्यायालयात दाखल एका याचिकेत दिल्ली विद्यापीठाने म्हटले की, विद्यापीठ सन १९७८ मधील बीएच्या विद्यार्थ्यांसंबंधित माहिती देऊ शकत नाही. विद्यापीठाने म्हटले की, माहितीचा अधिकार नियमानुसार फिड्यूशियरी संबंध असल्यामुळे माहिती उघड केली जाऊ शकत नाही. दिल्ली विद्यापीठाचा दावा आहे की, सन १९७८ मध्ये मोदींनी येथून बीए केले होते.

यापूर्वी विद्यापीठाने आयोगाला म्हटले



होते की, ही तिसऱ्या पक्षाची व्यक्तिगत माहिती आहे, जी सार्वजनिक केली जाऊ शकत नाही. हा तर्क रद्द ठरवत आयोगाने म्हटले होते की, या तर्काची कुठलीही कायदेशीर बाजू नाही. सोबतच विद्यापीठाला १९७८ मधील बीएच्या विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती दाखविणे आणि त्या संबंधित प्रती विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले होते. यानंतर विद्यापीठाने माहिती आयोगाच्या या निर्देशाविरोधात दिल्ली उच्च न्यायालयाकडे धाव घेत निजतेचा अधिकार आणि विश्वासपात्र संबंध असल्याचे उदाहरण देऊन ही माहिती देण्यास नकार दिला होता.

यानंतर न्यायालयाने जानेवारी २०१७ मध्ये माहिती आयोगाच्या आदेशावर प्रतिबंध लावला होता. या सोबतच विद्यापीठाला या प्रकरणात कोणतेही अन्य उत्तर दाखल करण्यास बंदी घातली होती.

अतिरिक्त सॉलिसिटर जनरल तुषार मेहता विद्यापीठाची बाजू मांडत आहेत. न्या.राजीव शकधर यांनी यावर उत्तर देण्यास सांगितल्यावर मेहता म्हणाले की, कार्यकर्त्याचे या संबंधित निहीत स्वार्थ जुळलेले आहे. तेच याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी म्हटले की, हे सार्वजनिक महत्त्वाशी संबंधित गंभीर प्रकरण आहे आणि न्यायालयाच्या या प्रकरणातील निर्णयाचा माहिती अधिकार प्रणालीवर सखोल परिणाम होईल. त्यांही हे सुद्धा सांगितले की, यापूर्वी न्यायालयाने केंद्रीय माहिती आयोगाचे सूचना आयुक्त आणि लोकपाल नियुक्ती संबंधित प्रकरणांमध्ये माहिती अधिकार कार्यकर्त्यांना जोडण्याची परवानगी दिलेली आहे.

माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी हा सुद्धा दावा केला आहे की, दिल्ली विद्यापीठाची याचिका कायद्यातील चुकीच्या व्याख्येवर आधारित आहे. उच्च न्यायालयाने माहिती अधिकार कार्यकर्त्यांना या प्रकरणाशी जुळण्याची परवानगी देण्यासाठी कारवाई सुरु केलेली आहे.

# देवीला रक्त चढवायच्या नावाखाली रक्तदानाचे अपील

## केरळमधील घटना, अंधश्रद्धेचा बाजार आजही सुरुच

**केरळ । मूलनिवासी वृत्तसंस्था**

देशामध्ये आजही अंधश्रद्धेचा बाजार सुरुच आहे. देवीला रक्त चढवायचे आहे, या नाव-ाखाली लोकांना रक्तदानाचे अपील करण्यात आले आहे. तिरअनंपुरम जिल्ह्यातील विथुरा गावातील देवीयोदु श्रीविदुआरी वैद्यनाथ मंदीर प्रशासनाने हे अपील केले आहे.

या वैद्यनाथ मंदीराचा १४ दिवस महोत्सव चालतो. आजपासून या महोत्सवाला सुरुवात झाली आहे. या महोत्सवात अभिषेक म्हणून लोकांचे रक्त चढविण्याची परंपरा आहे. या प्रथेला अनुसरुन येथील मंदीर प्रशासनाने दे-वीला रक्त चढविण्याच्या नावाखाली लोकांना रक्तदान करण्याचे अपील केले आहे. सरकारी मान्यताप्राप्त तज्ञांच्या माध्यमातून रक्त संकलन केले जाते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी देवीला रक्ताचा अभिषेक केला जातो. अशा प्रकारचा अंधश्रद्धेचा बाजार सुरु आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना पुन्हा एकदा खोल गर्तेत टाकण्याचे काम खुलेआमपणे सुरु आहे. याला विरोध करणे गरजेचे आहे.



# ईव्हीएम विरोधात माकपनेही उठवले सवाल!

## प्रसारमाध्यमे भाजपच्या दावणीला, माकपची मुख्य निवडणूक आयुक्तांकडे तक्रार

**त्रिपुरा । मूलनिवासी वृत्तसंस्था**

ईव्हीएमद्वारे नि:ष्पक्ष व पारदर्शक निवडणूक होऊ शकत नाही, असे सांगत ईव्हीएमबाबत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने अनेक सवाल उप–स्थित केले आहेत. याबाबत माकपचे केंद्रीय सचिवालयाचे सदस्य निलोत्पल बसू यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ओमप्रकाश रावत यांच्याकडे तक्रार केली आहे. तर निवडणुकीच्या आदल्या दिवशी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशिवाय ईव्हीएम उघडण्यात आले. याबाबत तक्रार करुनही प्रसार माध्यमांनी दखल घेतली नाही. त्यामुळे प्रसार माध्यमे भाजपच्या दावणीला बांधली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे त्रिपुरा विधानसभा निवडणूकही वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

निलोत्पल बसू म्हणाले, मुख्यमंत्री माणिक सरकार यांच्या धनपूर आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष विप्लवकुमार देव यांच्या बलरामपूर विधानसभा क्षेत्रात ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटीमध्ये गडबडी झाल्याच्या अनेक तक्रारी दाखल झालेल्या आहेत. याशिवाय अन्य विधानसभा क्षेत्रातूनही तक्रारी आलेल्या आहेत. त्रिपुरामध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत नक्कीच हेराफेरी झालेली आहे. काही मतदान केंद्रांवरील ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी काम करत नव्हते. ५९ विधानसभा क्षेत्रामधील ३१७४ मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशीन खराब होत्या तर ५१९ केंद्रांवर स्थिती तशीच होती.

काही मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशीन राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या अनुपस्थित निवडणुकीच्या आदल्या दिवशी उघडण्यात आले. पानीनगर विधानसभा क्षेत्रातील सर्व ईव्हीएम अगोदरच उघडण्यात आले. त्याशिवाय धर्मानगर विधानसभा क्षेत्रातील १२ आणि जुबाजनगर क्षेत्रातील ३ ईव्हीएम उघडण्यात आले. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या अनुपस्थित ईव्हीएम उघडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना कोणी अधिकार दिले?

अभियंत्यांनी या ईव्हीएमसोबत काय गडबड केली हे रहस्यच आहे, असा सवाल निलोत्पल बसू यांनी उपस्थित केला आहे.

दरम्यान याबाबत मुद्रीत आणि ईलेक्ट्रॉनिक माध्यमांना माकपच्या माध्यमातून कळविण्यात आले. एखाद्या राजकीय पक्षाकडून अशातऱ्हेची बातमी येत असेल तर प्रसार माध्यमांनी त्याची शहानिशा करुन ती बातमी देशभरात प्रसारीत करायला हवी होती. परंतु कुठल्याही प्रसार माध्यमांनी त्याकडे ढुंकूनही पाहिले नाही. त्यामुळे सर्वच प्रसार माध्यमे भाजपाच्या दावणीला बांधलेली असल्याचा आरोप बसू यांनी केला आहे.

### ...आणि माणिक सरकार ५,१४२ मतांनी जिंकले

ज्यावेळी मतमोजणी सुरु झाली त्यावेळी माणिक सरकार २ हजार मतांनी मागे आहेत, अशी प्रसार माध्यमांवर ब्रेकिंग न्यूज दाखविण्यात येत होती. त्यावेळी माणिक सरकार यांचा पराभव होईल, असे माकपच्या कार्यकर्त्यांना वाटले. चौथ्या फेरीपर्यंत माणिक सरकार भाजपच्या उमेदवारा–पेक्षा मागे होते. परंतु तेवढ्यात भाजपाने ईव्हीएम मशीनच्या आतमध्ये असलेल्या स्लीपवर माकपच्या प्रतिनिधिने सही केली नसल्याचे तक्रार केली. त्यामुळे त्वरित मतमोजणी थांबविण्यात आली. दरम्यान पुनरमतमोजणीत ज्यावेळी माणिक सरकार ५ हजार १४२ मतांनी जिंकले त्यावैळी भाजप पदाधिकाऱ्यांचे चेहरे पाहण्यासारखे होते.

### मीडियाची पोलखोल

कुठल्याही राज्याची किंवा लोकसभेची निवडणूक होण्याआधी सहा महिन्याअगोदर मागच्या निवडणुकीचे विश्लेषण केले जाते. सत्ताधारी पक्ष कसा जिंकला याची पोपटपंची केली जाते आणि आगामी निवडणुकीत सत्ताधारी पक्ष कसा आघाडीवर असेल याची टिमकी वाजविली जाते. त्यामुळे हे विश्लेषण पाहणाऱ्या मतदारांच्या विचारात परिवर्तन होऊन त्याचे सत्ताधाऱ्यांबद्दल अनुकूल असे जनमत बनविले जाते. त्यानंतर निवडणूक होण्याअगोदर एक्झिट पोल दाखविले जाते आणि तेच एक्झिट पोल राजकीय पक्षाला निवडणूक जिंकून देतात. ज्यावेळी मतदानाची आकडेवारी येते त्यावेळी निवेदक आपण एक्झिट पोल कसे दाखविले होते ते कसे खरे ठरले याबाबत भाष्य करतो. त्याचबरोबर आरएसएसने किती मेहनत केली त्यामुळे त्यांना यश मिळाले, असे वारंवार सांगूनही निवेदक थकत नाही. हे सर्व लोकांना मूर्ख बनविण्याचे नियोजन केले जाते आणि आपण ईव्हीएमच्या व मूर्ख बनविण्याच्या मायाजाळात अलगद फसलो जातो.

# आता गौतम अदानी एसबीआयचे ६२ हजार कोटी बुडवणार?

## मोदी सरकारच्या कालखंडातील कर्ज, ऑस्ट्रेलियातील व्यवसाय संकटात असल्याची बतावणी

**नवी दिल्ली । मलनिवासी वृत्तसंस्था**



विजय माल्या, नीरव मोदी, मेहुल चौक्सी, विक्रम कोठारी सारख्या बड्या उद्योजकांनी हजारो कोटींचा बँकांना चुना लावला आहे. त्यामुळे अर्थव्यवस्था डबघाईला आली असताना आता ऑस्ट्रेलियातील व्यवसाय संकटात असल्याची बतावणी करत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जवळ असलेला उद्योजक गौतम अदानी एसबीआयकडून घेतलेले ६२ हजार कोटी कर्ज बुडविण्याच्या तयारीत असल्याची माहिती बोलता हिंदुस्थान या वेबसाईटने दिली आहे. एवढा मोठा घोटाळा झाल्यास देशातील बँका रसातळाला जातील, अशी भीती अर्थतज्ज्ञांना वाटत आहे.

दरम्यान ६२ हजार कोटी ही रक्कम निरव मोदी याच्या घोटाळ्यापेक्षा जास्त आहे. ऑस्ट्रेलियामध्ये अदानी समूहाने गौणखनिज (कोळसा खाण) प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात पैशांची गुंतवणूक केली आहे. परंतु हा व्यवसाय आता संकटात आल्याचे गौतम अदानी यांचे म्हणणे आहे. या व्यवसायासाठी एसबीआयने कर्ज पुरवठा केला होता. ऑस्ट्रेलियात गौणखनिज (कोळसा खाण), रेल्वे आणि बंदर विकासासाठी ३.३ अरब डॉलरची गुंतवणूक अदानी समूहाकडून झाली आहे. यासाठी नरेंद्र मोदींच्या कालखंडातच अदानी यांना ६२ हजार करोड कर्ज एसबीआयने दिले आहे. आजपर्यंत कुठल्याही उद्योजकाला त्यांच्या परदेशात चा–लणाऱ्या उद्योगांसाठी एवढे मोठे कर्ज दिले गेलेले नाही. परंतु अदानींना दिले गेले. दरम्यान पर्यावरण धोक्यात येईल, ही कारणे दाखवत ६ आंतरराष्ट्रीय बँकांनी अदानी यांना कर्ज देण्यास नकार दिला. त्याचबरोबर चीनमधील सर्वात मोठ्या असलेल्या २ बँकांनीही अदानी यांना कर्ज देण्यापासून रोखले.

संकटात आलेल्या उद्योगाला ऑस्ट्रेलिया सरकारकडून सहकार्य मिळेल अशी अपेक्षा अदानी यांना होती. परंतु ऑस्ट्रेलियामध्येच या सर्व उद्योगांना मोठ्या प्रमाणात विरोध झाला. आंतरराष्ट्रीय प्रसार माध्यमांनीही याविरोधात शड्डू ठोकले. या सर्वांचा विचार करुन ऑस्ट्रेलिया सरकारनेही अर्थ पुरवठा करण्यास नकार दिला. ऑस्ट्रेलिया सरकारने नकार दिल्यामुळे अदानींचे उद्योग डुबण्याच्या मार्गावर आहेत. भारतामध्ये अदानी यांच्यावर ९६ हजार ३१ कोटी रुपयांचे कर्ज आहे. एससबीआय आणि अन्य बँकांचे कर्ज डुबले तर बँकींग क्षेत्राला मोठा झटका बसू शकतो.

### अदानींची संपत्ती १०९ टक्क्याने वाढली

**नवी दिल्ली । मूलिनवासी वृत्तसंस्था**

महागाई आणि भूकबळीला सर्वसामान्य लोक समोरे जात असताना या देशातील अनेक उद्योगपतींची मालमत्ता मोठ्या संख्येने वाढताना दिसत आहे. मोदी सरकारच्या कालखंडात त्यांच्या जवळचे असलेले गौतम अदानी यांची संपत्ती १०९ टक्क्याने वाढली आहे. जगातील १०० अब्जाधीशांमध्ये त्यांचा समावेश झाला आहे.



२०१८ च्या जागतिक श्रीमंतांच्या यादीमध्ये अदानींच्या संपत्तीत १०९ टक्के वाढ झाली आहे. १४ अरब डॉलर म्हणजे ९१ हजार २४५ कोटी रुपये वाढ झाली आहे. नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांच्यावर गौतम अदानी यांना आर्थिक लाभ देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. ते आरोप चुकीचे नसल्याचे आता समोर आले आहे. कारण मोदी प्रधानमंत्री झाल्यानंतर काही दिवसातच अदानी यांना एसबीआयकडून ६२ हजार कोटी कर्ज मिळाले होते. त्याचवेळी शेतकऱ्यांची जमीन कवडीमोल भावाने घेऊन अदानी यांना जमिनीची खैरात करण्यात आली होती. त्यासाठी भूमी अधिग्रहण कायदा करण्यात आला. २०१४–१५ चा वार्षिक अर्थसंकल्पही अदानीसारख्या उद्योगपतींना डोळ्यासमोर ठेवून तयार करण्यात आला होता. त्यानुसार देशातील उद्योगपतींना ५ लाख ८९ हजार २९८ कोटी रुपये पॅकेजच्या नावावर वाटण्यात आले होते. त्यामुळे २०१५–१६ मध्ये देशावर ७० लाख कोटी रुपयांचे कर्ज वाढले. त्यासाठी देशाला दरवर्षी ४२७ हजार कोटी व्याज द्यावे लागत आहे.

#### ‘सबका साथ, सबका विकास’ घोषणा खोटी

आज देशामध्ये भूकबळींची संख्या ३० कोटी आहे. तर दुसऱ्या बाजूला दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या ८३ कोटी आहे. चांगले उत्पादन न झाल्यामुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत. त्यामुळे मोदी सरकारची ‘सबका साथ सबका विकास’ ही घोषणा सपशेल खोटी ठरली आहे.




।। जय विठोबा रखुमाई ।।



'सत्यशोधक मूलनिवासी वारकरी महासंघ, महाराष्ट्र राज्य' आयोजित

# राज्यस्तरीय पुरोगामी संत साहित्य संमेलन

दिनांक १७ व १८ मार्च, २०१८

ठिकाण : जिजाई लॉन्स व मंगल कार्यालय, राशीन ता.कर्जत, जि. अहमदनगर

**कार्यक्रम पत्रिका**

दिनांक : १७ मार्च, २०१८ वार : शनिवार

उद्घाटन सत्र (सकाळी ९.०० ते दुपारी १२.००)

**मान्यवरांचे स्वागत**

प्रास्ताविक : शि.भ.प.कैलास महाराज साबळे (कार्याध्यक्ष, स.मु.वा.महासंघ, महाराष्ट्र राज्य)

उद्घाटक : ह.भ.प.अजय महाराज बारस्कर, अहमदनगर

प्रमुख वक्ते : मा.बाळासाहेब मिसाळ पाटील

मा.श्री.शिवाजी नाना पाटील–अमळनेर

**अध्यक्षता : ह.भ.प.दादा महाराज पनवेलकर**

**प्रतिष्ठीत मान्यवर**

मा.संभाजीराजे राजे भोसले (राशिन), मा.विजय नाना मोढळे, मा.राजेंद्र भैया देशमुख, मा.सुरेश भालेराव, पुणे, मा.शामभाऊ कानगुडे, मा.संग्राम पाटील, मा.आप्पुशेठ बजाज, मा.चंदू आबा जगताप, मा.भरतशेठ भुट्टे पाटील, मा.नवनाथ शेठ शिंदे (तळवडी), मा.जालूशेठ काळे, मा.भिमराव साळवे, मा.तात्या माने, मा.स्वप्नील शिंदे (सरपंच, तळवडी), मा.राहुल बनसोडे पाटील, ह.भ.प.अंकुश खोडवे, ह.भ.प.भाऊसाहेब शिंदे, ह.भ.प.हनुमंत पावणे महाराज, मा.शरद आढाव, मा.शिवाजीनाना कोळपे (ताजू) डॉ.शिवाजी काळे, डॉ.अंकूश काळे, मा.प्रकाश लंकेश्वर नाना (पुणे), मा.राजेंद्र देवगावकर, मा.शेटे सर, मा.नवीन बोर, मा.महादेव लोखंडे, पुणे.

दुपारी १२.३० ते २.०० सहभोजन

प्रथम दिन दुसरे सत्र : वेळ दुपारी २.०० ते ४.००

**पुरोगामी साहित्यिकांचे साहित्य वाचन**

टिप : प्रत्येक साहित्यिकास आपले स्वतःचे साहित्य लिहिलेले वाचन करण्यास फक्त पाच मिनिटे वेळ दिला जाईल. साहित्यांचे परिक्षण करुन अंतिम तीन क्रमांक निवडले जाऊन त्यांचा यथोचित सत्कार केला जाईल. निवडीच्या निकषांमध्ये वेळ मर्यादाही लक्षात घेतली जाईल.

**परीक्षक**

मा.सुरेश पाटील साहेब–कल्याण, मा.शिवाजीनाना पाटील–जळगाव

मा.ह.भ.प.भगवान घुगे महाराज (शास्त्री), मा.बाळासाहेब मिसाळ पाटील

प्रथम दिन तिसरे सत्र : चर्चा सत्र वेळ – दुपारी ४.०० ते ६.००

**विषय**

१) वारकरी संत साहित्यामध्ये झालेली घुसखोरी

२) पुरोगामी संतसाहित्य निर्मितीची आवश्यकता

**वक्तागण**

ह.भ.प.भगवान घुगे महाराज शास्त्री, पाथर्डी, ह.भ.प.गंगाधर कुरुंदकर, हिंगोली, ह.भ.प.ज्ञानेश्वर लोखंडे, ठाणे, ह.भ.प.गणेश फरताळे, कोरेगाव पुणे, मा.सुरेश पाटील साहेब, कल्याण ठाणे, ह.भ.प.शारदाताई महाराज, मंगळवेढा, ह.भ.प.बबन महाराज तागडे,ह.भ.प.दुष्यंत क्षीरसागर महाराज, देहू पुणे, ह.भ.प.सुनंदाताई भोस, श्रीगोंदा

**अध्यक्षता : ह.भ.प.दादा महाराज पनवेलकर**

रात्री ७.०० ते ८.०० – सहभोजन | ८.०० ते १०.०० किर्तन

रविवार दिनांक १८ मार्च २०१८ (दुसरा दिवस)

सत्र पहिले : वेळ : सकाळी ८.०० ते १०.००

**पुरोगामी साहित्यिकांचे साहित्य वाचन**

वेळ मर्यादा – प्रत्येकी ०५ मिनिटे फक्त

टिप : ज्यांनी अगोदरच्या सत्रात साहित्य वाचन केले त्यांना पुन्हा वाचन संधी उपलब्ध होणार नाही. ज्या साहित्यिकांना संमेलनात आपले साहित्य वाचन करायचे आहे, त्यांनी आपल्या लेखनाची एक नक्कल/प्रत संयोजकाकडे द्यावी.

परिक्षक – नेहमीचे

द्वितीय दिन, दुसरे सत्र – चर्चासत्र (सकाळी १०.०० ते १२.००)

**विषय**

१) वारकरी संतांची सत्य विचारधारा

२) विद्रोही संत जगद्गुरु तुकाराम महाराज (अणूरेणूया थोकडा । तुका आकाशाएवढा ।।)

**वक्तागण**

ह.भ.प.डॉ.फडतरे महाराज (सातारा), ह.भ.प.अजय महाराज बारस्कर, अहमदनगर, ह.भ.प.अनिल तळपे, नाशिक, ह.भ.प.कांचनताई, रायगड, ह.भ.प. शांताराम कांबळे (वडगाव), ह.भ.प.सिद्धनाथ मेटे, शिवव्याख्याते कैलास मुसळे, पुणे, ह.भ.प.कृष्णचंद्र नारायण पवार (शास्त्री), देहू पुणे, ह.भ.प.किसन विठ्ठल गायकवाड महाराज देगलुरकर

**अध्यक्षता : ह.भ.प.दादा महाराज पनवेलकर**

दुपारी १२.०० ते १.०० सह भोजन

द्वितीय दिन, अंतिम सत्र, वेळ : १.३० ते ४.००

**विषय**

१) वारकरी धर्माकडून आजच्या समाजाची अपेक्षा

२) वर्तमान काळात वारकरी विचारधारेची गरज

**वक्तागण**

ह.भ.प.रामेश्वर त्रिमुखे, जालना, ह.भ.प.चिंतामणी महाराज, पंढरपूर, ह.भ.प.राऊत महाराज (अलिबाग), ह.भ.प.पोंगडे महाराज, सुधागड पाली, शि.भ.प.कैलास साबळे महाराज, ह.भ.प.मारुती महाराज भोर, नारायणगाव, पुणे, ह.भ.प.प्रभाकर महाराज फुलसुंदर, नारायणगाव, पुणे

**अध्यक्षता : ह.भ.प.दादा महाराज पनवेलकर**

आभार : प्रा.बाळासाहेब धावारे सर (देहू पुणे)

आयोजक : कैलास साबळे, सचिन काळे, गणेश फरताळे, बबन तागडे

संपर्क : ९९३०५५९१०७, ८६८९८१२८१७, ८३०८८९१५७४, ७७६९९२९५३१

**विशेष आभार**

शि.भ.प.सतिष आण्णा काळे – अध्यक्ष : सत्यशोधक मूलनिवासी वारकरी महासंघ, नगर

शि.भ.प.कैलास भिकाजी साबळे–तळवडीकर – कार्याध्यक्ष : सत्यशोधक मूलनिवासी वारकरी महासंघ, महाराष्ट्र राज्य

मा.परशुराम थोरात (साहेब) – सचिव, स.मु.वा.महासंघ, ता.कर्जत, जि.अहमदनगर

मा.तात्या भांडवलकर, मा.बापू खोडवे, मा.अनिल कांबळे, मा.सोमनाथ पवार, उद्योजक, श्रीगोंदा

टिप : दुरुन येणारे साहित्यिक व कार्यकर्ते यांची अगोदरच्या दिवशी (१६ मार्च, २०१८) राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.


# १० राष्ट्रीय महामार्ग लिजवर देणार

## ६ हजार ६०० कोटी कमावण्याचा फंडा

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**

देशातील १० राष्ट्रीय महामार्ग लिजवर देण्याचा नवा फंडा सरकारने आखला आहे. या माध्यमातून ६ हजार ६०० कोटी रुपये कमाविण्याचा सरकारचा मानस आहे. यामुळे राष्ट्रीय महामार्गांचेही खाजगीकरण करण्याचे मोदी सरकारचे षड्यंत्र आहे.



दरम्यान येणाऱ्या रकमेचा रस्ते विकासासाठी वापर केला जाणार आहे. नॅशनल हायवेज ऑथरिटी ऑफ इंडियाचे सदस्य रोहीत कुमार सिंह म्हणाले की, हे महामार्ग लिजवर देण्यासाठी अनेक कंपन्यांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. हे महामार्ग टोल ऑपरेट ट्रान्सफर (टिओटी) तत्त्वावर देण्यात येणार आहेत. त्यासाठी या १० महामार्गांची सूची तयार केली जात आहे. सरकारने गुजरात आणि आंध्र प्रदेशमधील राष्ट्रीय महामार्ग लिजवर देण्यासाठी निर्णय घेतला होता. त्यासाठी ऑस्ट्रेलियातील इन्वेस्टमेंट बँक आणि फायनान्सियल सर्व्हिसेस ग्रुपने निविदा भरली होती. कंपनीने ९ राष्ट्रीय महामार्गासाठी ९ हजार ६८१ कोटीची निविदा भरली होती. परंतु सरकारला केवळ ६ हजार २५८ कोटी रुपये मिळतील, अशी अपेक्षा होती. परंतु ती फोल ठरली.

### राष्ट्रीय महामार्गांचे खाजगीकरणाच्या दिशेने पाऊल

राष्ट्रीय महामार्गात खाजगी क्षेत्राची हिस्सेदारी वाढावी म्हणून टोल ऑपरेट ट्रान्सफर (टिओटी) मॉडेल विकसीत केले गेले आहे. या तत्त्वानुसार जी कंपनी हे राष्ट्रीय महामार्ग लिजवर घेते ती कंपनी एकमार्गी सरकारकडे रक्कम जमा करते. त्या बदल्यात कंपनीला टोल वसूल आणि सर्व ऑपरेट करण्याची सहमती दिली जाते. त्याशिवाय ३० वर्ष करार केला जातो. राष्ट्रीय महामार्ग लिजवर देऊन त्यातून मिळणाऱ्या रकमेचा वापर भारतमालासारख्या योजनेवर खर्च केला जाणार असल्याचे सांगण्यात आले. आगामी ५ वर्षात अशा प्रकारचे राष्ट्रीय महामार्ग लिजवर देत किमान २ लाख कोटी मिळण्याची सरकारला अपेक्षा आहे.

# सरकार उद्योगपतींचेच पुरवितेय चोचले ...

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**

**२०१६-१७ मध्ये उद्योगपतींचे ८१ हजार ६८३ कोटी कर्ज माफ**



हे सरकार आम जनतेचे आहे की उद्योगपतींचे, असा प्रश्न त्यांनी राबविलेल्या धोरणांवरुन उपस्थित होत आहेत. कारण २०१६-१७ मध्ये उद्योगपतींचे ८१ हजार ६८३ कोटी रुपये कर्ज माफ करण्यात आल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी दिली. सरकारच्या माध्यमातून उद्योगपतींचेच चोचले पुरविले जात असल्याने आता आम जनतेने जगावे कसे? असाही प्रश्न निर्माण झाला आहे.

आरबीआयने दिलेल्या आकडेवारीनुसार गतवर्षी एसबीआयने २० हजार ३३९ कोटी उद्योगपतींचे कर्ज माफ केले. या आर्थिक वर्षात ३० सप्टेंबरपर्यंत २८ हजार ७८१ कोटी रुपयांची माफी देण्यात आली. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी २०१२-१३ च्या दरम्यान २७ हजार २३१ कोटी रुपयांचे कर्ज माफ केल्याची माहिती जेटली यांनी दिली. आरबीआयच्या दिलेल्या निर्देशानुसार आणि बँकांच्या संचालक मंडळाच्या निर्णयानुसार एनपीएमुळे हे कर्ज माफ करण्यात आले. दरम्यान पीएनबीच्या घोटाळ्याप्रकरणी १३ देशांकडे निरव मोदीच्या कंपनी संदर्भात त्याच्या अकाऊंटची संपूर्ण माहिती मागविण्यात आली आहे. या प्रकरणी १८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. ईडीने मनी लॉंड्रिंग ॲक्ट खाली गुन्हा दाखल केला आहे. निरव मोदीच्या घोटाळ्याबाबत २०१६ मध्येच हरी प्रसाद यांनी सरकारला संकेत दिले होते. अशा प्रकारचा प्रश्न विचारल्यावर जेटली यांनी या घोटाळ्याची माहिती देण्यात आली नव्हती, असे सांगत हात वर केले.



# जेएनयू विद्यापीठात ७४९ पैकी फक्त ४ पास

## हिंदीतून एमफील, पीएचडी लेखी प्रवेश परीक्षा

**नवी दिल्ली । मूलनिवासी वृत्तसंस्था**

जवाहरलाल नेहरु विद्यापीठात नवीन शैक्षणिक सत्रातील प्रवेश परीक्षेचे निकाल लागलेले आहेत. हिंदी विभागामध्ये एकूण ७४९ विद्यार्थ्यांनी एमफील/पीएचडी करण्यासाठी परीक्षा दिली होती. मात्र या प्रवेश परीक्षेत फक्त चार विद्यार्थी पास झाल्याने शंका उपस्थित केली जात आहे.

जेएनयू विद्यापीठातील नवीन शैक्षणिक सत्रासाठी घेतलेल्या प्रवेश परीक्षेचे निकाल लागलेले आहेत. हिंदी विभागामध्ये हिंदीतून एमफील, पीएचडी करण्यासाठी ७४९ विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली होती. ज्यापैकी फक्त ४ विद्यार्थी पास झाले आहेत. त्यामुळे फक्त चारच उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले आहे. जेव्हा की हिंदी विभागात एकूण १२ जागा आहेत. इतर केंद्राचीही हीच अवस्था आहे. किमान उमेदवारांना मुल-ाखतीसाठी बोलाविल्या गेले आहे.



मागास व वंचित समुहातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण दिले जाऊन राहिलेले नाहीत. सेंटर फॉर इंडियन लँग्वेजचे प्रमुख गोविंद प्रसाद यांनी म्हटले की आरक्षणाचे धोरण समाप्त केले गेले आहे.

त्यांनी म्हटले की, हिंदी विभागात १२ जागा रिक्त आहेत. परीक्षा देणाऱ्या ७४९ मधून फक्त चारच लोकांना नियुक्तीच्या मुल-ाखतीसाठी बोलाविल्या गेले आहे. याबाबत कुठलाही भरवसा नाही की लेखी परीक्षा पास केल्यानंतरही ते मुलाखतीसाठी यशस्वी होतील. शेवटच्या निवडीसाठी मुलाखत महत्त्वाची आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या २०१६ च्या अधिसूचनेत मुलाखत देण्यासाठी लेखी परीक्षेत ५० टक्के गुण मिळविणे सक्तीचे केले आहे. या आधारेच शेवटीची निवड केली जाईल. यापूर्वी जेएनयू लेखी परीक्षेला ७० टक्के आणि मुलाखतीला ३० टक्के गुण देत होते आणि दूरवरुन येणाऱ्या किंवा मागास समुहातील विद्यार्थ्याला गुणापासून वंचित केले जात होते.

### विद्यार्थ्यांची यादी नोटीस बोर्डावर नाही

जवाहरलाल नेहरु विद्यापीठातील विद्यार्थी संघटनेने मुलाखतीसाठी बोलविल्या गेलेल्या विद्यार्थ्यांची संख्या फारच कमी असल्याचे सांगितले. विद्यार्थी संघटनेचा आरोप आहे की, विद्या-पीठ प्रशासन निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी नोटीस बोर्डावर लावलेली नाही. विद्यापीठात असे पूर्वी कधीच झालेले नाही.

# ब्राह्मणांची पळताभुई थोडी

## दादू कोंडदेवची प्रतिमा लावण्यावरुन संभाजी ब्रिगेड-ब्राह्मण महासंघात हमरी-तुमरी

**पुणे । मूलनिवासी प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेच्या आवारात दादू कोंडदेवची प्रतिमा कशी काय लावली, असा सवाल संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी करताच घाबरलेल्या ब्राह्मणांची पळताभुई थोडी झाली. प्रतिमा लावण्यावरुन संभाजी ब्रिगेड व ब्राह्मण महासंघात हमरीतुमरी झाली. अखेर दोन तासांनी ब्राह्मण महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी काढता पाय घेतल्यानंतर वाद निवळला.

दादू कोंडदेवच्या पुण्यतिथीनिमित्त ब्राह्मण महासंघाचा अध्यक्ष आनंद दवे याच्या नेतृत्वाखाली महापालिकेच्या आवारासमोर दादू कोंडदेवची प्रतिमा लावून पूजन करण्यात आले. ही बातमी संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांना कळताच त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी धाव घेतली. महापालिकेच्या आव-ारात दादू कोंडदेची प्रतिमा कशी लावता? याबाबत महापालिकेची परवानगी घेतली आहे का? अशा प्रश्नांची सरबत्ती संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष आनंद दवे यांच्यासमोर केली. या प्रश्नावरुन दवे पुरते भांबावले आणि प्रश्नांना उत्तरे न देताच तिथे जमलेल्या ब्राह्मणांची पळताभुई थोडी झाली. दोन तासातच ब्राह्मणांनी काढता पाय घेतल्याने हा वाद निवळला.



आमदार मेधा कुलकर्णी व महापौर मुक्ता टिळक यांचा अप्रत्यक्ष पाठींबा ब्राह्मण महासंघाला आहे. त्यामुळेच दवे यांनी धाडस करुन महापालिकेच्या आवारात दादू कोंडदेवच्या प्रतिमेचे पूजन केले. अशाप्रकारचा कार्यक्रम घेऊन समाजात तेढ पसरविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न ब्राह्मण महासंघाकडून होत आहे, असा आरोप संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी केला.

पुणे महापालिकेत काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता असताना दादू कोंडदेवचा पुतळा लाल महालातून हटविण्यात आला होता. मात्र पुण्यात कोठेतरी दादू कोंडदेवचा पूतळा बसवू, असे महापालिकेने ब्राह्मण महासंघाला आश्वासन दिले होते. आश्वासनाची पूर्तता न झाल्यामुळे लक्ष वेधण्यासाठी महापालिका आवारात प्रतिमा पुजनाचा कार्यक्रम घेण्यात आल्याचा लंगडा युक्तीवाद दवे यांनी केला.

# ‘तिहेरी तलाक’ विधेयकाविरोधात मुस्लीम महिलांचा एल्गार

**कोलकाता । मूलनिवासी वृत्तसंस्था**

केंद्रातील मोदी सरकारने ‘तिहेरी तलाक’ संबंधीत विधेयक लोकसभेत पारित केल्यानंतर संपूर्ण देशभरात मुस्लीम महिलांकडून यावर कडाडून विरोध केला जात आहे. ज्या मुस्लीम महिलांसाठी सरकारने हे विधेयक पारित केले आहे, त्या महिलाच आता या विधेयकाचा विरोध करत असल्याने सरकारची बोलत बंद झाली असल्याचे दिसून येत आहे. संपूर्ण देशभरात मुस्लीम महिला या विधेयकाला विरोध करत असून लाखोंच्या संख्येने सरकार विरोधात एल्गार पुकारत आहेत. त्याचाच प्रत्यय म्हणजे कोलकाता येथेही ३० हजार महिलांनी रस्त्यावर येऊन तिहेरी तलाक विरोधात प्रदर्शन केले आहे.

मंगळवारला कोलकाता येथे ३० हजारहून अधिक मुस्लीम महिलांनी तिहेरी तलाक विधेयकाचा विरोध करत सरकारला हे विधेयक वापस घेण्याची मागण केली.

प्रदर्शनकारी महिलांचे म्हणणे आहे की, मोदी सरकारने मुस्लीम महिलांशी तसेच मुस्लीम संघटना किंवा नेत्यांशी कुठलीही चर्चा न करता सरकार बळजबरीने हे विधेयक मुस्लीम महिलांवर थोपवत आहे. इतकेच नाही तर तिहेरी तलाक हे विधेयक कुराणच्या विरोधात असून मुस्लीम धर्मशास्त्राशी




तर्कसंगत नाही. त्यामुळे सरकारने हे विधेयक वापस घ्यावे.

बुरका घालून आलेल्या महिला कोलकाता येथील रफी अहमद किदवई रस्त्यावरील एका मुस्लीम सभागृहात गोळा झाल्या. यानंतर हातात मागण्यांचे फलक घेत राज्यपालांच्या भवनाकडे घोषणा देत आगेकूच केली. यानंतर महिलांच्या प्रतिनिधी मंडळाने राज्यपाल केसरीनाथ त्रिपाठी यांना एक निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, तिहेरी तलाक विधेयक हे भारतीय संविधानाच्या विरोधात आहेत. तसेच सदर विधेयक हे मुस्लीम महिला व मुलांच्या विरोधात आहे. काही महिलांचे असेही म्हणणे आहे की, केंद्र सरकार तिहेरी तलाकच्या माध्यमातून समान नागरिक सहिता कायदा लागू करण्याच्या तयारीत आहे. ज्यामुळे प्रत्येक समुहातील धार्मिक रितीरिवाज आणि धर्मासंबंधित कायदे समाप्त होतील.

# देश तोडणाऱ्या शक्तींना भारत सरकारने दिला पैसा

## फारुक अब्दुल्ला यांचा खळबळजनक गौप्यस्फोट


**जम्मू । मूलनिवासी वृत्तसंस्था**

नॅशनल कांफ्रेसचे नेते फारुक अब्दुल्ला यांनी एक खळबळजनक गौप्यस्फोट केलेला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, भारत सरकार देश तोडू पाहणाऱ्या विघातक शक्तींना आर्थिक मदत देण्यात आली. पैशाने भरलेल्या बॅग त्यांना पाठविल्या जातात. जेणेकरुन नॅशनल कांफ्रेसला पराभूत केले जाऊ शकेल. त्यामुळे सरकारने सावध पवित्रा घेतला असल्याचे दिसून येत आहे.

टाईम्स नाऊने जारी केलेल्या व्हिडिओनुसार फारुक अब्दुल्ला म्हणाले की, ‘यामध्ये कोणतीही शंका नाही की अनेक शक्ती अशा आहेत ज्या भारताचे विभाजन करण्यास इच्छूक आहेत. त्यांना वाटते की, भारताचे विभाजन व्हावे. या देशविघातक शक्तींना भारत सरकारकडून आर्थिक मदत दिली गेली. पैशाने भरलेल्या बॅग त्यांना पाठविल्या जाते जेणेकरुन नैशनल कांफ्रेसचा पराभव केला जाऊ शकेल.’

जम्मूत्तील एका कार्यक्रमादरम्यान फारुक अब्दुल्ला म्हणाले, ‘मी त्यांना म्हणालो की, तुम्ही हे काय करत आहात, तेव्हा ते म्हणाले की, यांनाही सोबत घ्यावे लागेल. मी म्हणालो जेव्हा हे उद्याला आपलीही कबर खोदतील तेव्हा काय बोलणार’ यापुढे फारुक अब्दुल्ला म्हणाले, ‘चूक आमची नाही किंतू त्यांची आहे जे दिल्लीत बसलेले आहेत. फारुक अब्दुल्ला कधी-कधी सत्य बोलतात मात्र ते इतर लोकांना पचत नाही असेच दिसून येते.

यापूर्वी फारुक अब्दुल्ला यांनी भारत-पाकिस्तानच्या फाळणीसाठी नेहरु, सरदार पटेल आणि मौलाना कलाम आझाद यांना जबाबदार धरले होते. ही बाब अर्धसत्य असून भारत-पाकिस्तानच्या फाळणीसाठी



पूर्णपण गांधीजी जबाबदार आहेत. काँग्रेस वर्कींग समितीच्या बैठकीत गांधीच्या समोर यावर शिक्कामोर्तब करुन फाळणीचा ठराव पास करण्यात आला ही बाब तितकीच सत्य आहे.

Postal Reg. No. NP City/391/2017-2019
संघर्षासाठी मूलनिवासी भारत
बामसेफ कार्यालय : भुरे कॉम्प्लेक्स,
दुसरा माळा, वैद्यनाथ चौक, नागपूर - ०९
फोन नं. ०७१२-२७५४३२६, मो. ०७७५६०२१४१८

प्रति,
________________
________________
________________

संघर्षासाठी मूलनिवासी भारत
RNI No. MAHMAR/3683,
रविवार, दिनांक ११ मार्च, २०१८
**Day of posting every Wednesday.**
**Posted at Nagpur, PSO**

# खायला अन्न नाही आणि बांधताहेत शौचालये

## हे विकासाचे मॉडेल मान्य नाही, सरकारविरोधात झारखंडमधील आदिवासी एकवटले

**झारखंड । मूलनिवासी वृत्तसंस्था**



आदिवासींना खायला अन्न नाही आणि या परिसरात शौचालये बांधली जात आहेत. हा कसला विकास, असा प्रश्न करुन हे विकासाचे मॉडेल आम्हाला मान्य नाही. या विरोधात झारखंडमधील आदिवासी एकवटले असून त्यांनी संविधानिक लढाई सुरु केली आहे.

शारदामारी गावाच्या सीमेवर तीर-धनुष्य घेऊन आदिवासींनी झारखंड सरकार विरोधात एल्गार पुकारला आहे. काही महिलांच्या हातांमध्ये विळे, फरशी आहे. काहींनी पारंपारिक हत्यारे घेतली आहेत. ग्रामसभा जिंदाबाद अशा प्रकारचा नारा देत आदिवासींनी तीर-धनुष्यासहीत आमचे स्वशासन आले पाहिजे, अशी मागणी केली आहे. बॅनरवर भारतीय संविधानाचा हवाला देण्यात आला आहे.

दरम्यान पाचव्या अनुसूचीमध्ये आदिवासींच्या क्षेत्रात स्वशासन व नियंत्रण असावे असे म्हटले आहे. संविधानाच्या १९ (५), (६) कलमानुसार आदिवासींना त्यांच्या क्षेत्रामध्ये स्वतंत्र भ्रमण करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. २४४ (१) भाग-ख, ५ (क) या कलमानुसार आदिवासी क्षेत्रात संसद अथवा विधीमंडळाचा कुठलाही कायदा लागू नाही. परंतु सरकारकडून विकासाच्या नावाखाली जोरजबरदस्ती चालू आहे. सर्वोच्च न्यायालयाचा हवाला देत 'इंडिया नॉन ज्युडिशियल' या शिर्षकाखाली काही गोष्टींवर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. जनादेश महत्त्वाचा नसून ग्रामसभा महत्त्वाची असल्याचे सांगण्यात आले आहे. या बॅनरसमोर बसून आदिवासींनी सांगितले की, हे आमचे संविधान आहे. त्याची आम्हाला माहिती असायला हवी.

याबाबत कोचांग गावचे सरपंच काली मुंडा बीबीसी या वृत्तसंस्थेशी बोलताना म्हणाले, आम्ही स्वशासनाची मागणी करतोय तो आमचा अधिकार आहे. या माध्यमातून आदिवासींना अधिकार देण्याचे प्रयत्न सुरु आहेत. आंदोलन करताना सरकारने रोखण्याचा प्रयत्न केला तर त्याला तोडीस तोड जबाब दिला जाईल. दरम्यान शंकर महली यांनीही सरकारला धारेवर धरले आहे. सरकारने आदिवासी महासभेच्या लोकांना चुकीच्या पद्धतीने अटक केली आहे. कारण हे लोक कोणाला भडकविण्याचे काम करत नाहीत तर संविधानाप्रती असलेली जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. याबाबत सरकारशी वार्ता करालाही ते तयार आहेत.

### मला कोण रोखतेय ते बघू-मुख्यमंत्र्यांचा उद्दामपणा

पत्थलगडी ही परंपरा आहे. परंतु चांगल्या कामासाठी ओळखली गेली पाहिजे. हे लोक राष्ट्रविराधी आहेत आणि असंविधानिक काम करत आहेत. आमचे सरकार त्यांना सोडणार नाही. मी स्वतः पत्थलगडी परंपरा राबविणाऱ्या गावात जाणार आहे. मला कोण रोखतेय ते बघू, असा उद्दामपणा झारखंडचे मुख्यमंत्री रघुवरदास यांच्या बोलण्यातून जाणवला. यावर मुख्य सचिव सुधीर त्रिपाठी म्हणाले, पत्थलगडी परंपरा सांभाळणारे लोक काही संदेश देऊ इच्छितात. हा संदेश आपण समजून घेतला पाहिजे.

# राजकीय पक्षांना नोटीस


## उच्च न्यायालयाचा असा हा कारभार, चोर सोडून संन्याशाला फाशी

**मुंबई । मूलनिवासी प्रतिनिधी**

कोरेगाव-भीमा येथे झालेल्या हिंसाचारानंतर पुकारण्यात आलेल्या बंद प्रकरणी उच्च न्यायालयाने बहुजन मुक्ती पार्टी, भारीप बहुजन महासंघ आणि बौद्धजन पंचायत समिती यांना नोटीस बजावली आहे. त्यांच्याकडून नुकसान भरपाई घ्यावी व ही रक्कम पीडितांना द्यावी, असे निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत. ज्यांनी हिंसाचार घडविला त्याचा मास्टर माईंड मिलिंद एकबोटे, संभाजी भिडे, आनंद दवे यांच्यावर कुठलीही कारवाई करण्याचे आदेश देण्याऐवजी राजकीय पक्षांनाच नुकसान भरपाई देण्याचे आदेश देणे म्हणजे उच्च न्यायालयाचा चोर सोडून संन्याशाला फाशी असा कारभार सुरु आहे.

दरम्यान या प्रकरणी राज्य सरकार, पोलीस महासंचालक, मुंबई पोलीस आयुक्त दत्ता पडसलगीकर यांना दोन आठवड्यात उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत. हिंसाचारानंतर पुकारण्यात आलेल्या बंदच्या वैधतेला ॲक्शन फॉर गुड गव्हर्नन्स अँड नेटवर्कींग व पब्लिक

**कोरेगाव-भीमा बंद प्रकरण**



कन्सर्न फॉर गव्हर्नन्स ट्रस्ट या चारिटेबल ट्रस्टनी जनहित याचिका दाखल केली होती. या याचिकेवर उत्तर देताना वरील आदेश उच्च न्यायालयाने दिले.

या याचिकेची सुनावणी न्या.शंतनू केमकर यांच्या खंडपीठासमोर झाली. बंदची हाक देणाऱ्या राजकीय पक्षांवर कारवाई करावी, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली होती. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांविरुद्ध कारवाई न करणाऱ्या पोलिसांचीही खातेनिहाय चौकशी करावी, असेही या याचिकेत म्हटले आहे.

## केशवप्रसाद मौर्य बरोबर बोललात

# एन्काऊंटर करणे म्हणजे रामराज्याला सुरुवात

**मौर्य यांच्यावर उपरोधिक टीका**



**उत्तर प्रदेश । मूलनिवासी वृत्तसंस्था**

एन्काऊंटर करणे म्हणजे रामराज्याला सुरुवात झाली आहे, अशी प्रतिक्रिया उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशवप्रसाद मौर्य यांनी दिली. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिलेल्या निर्देशानुसार उत्तर प्रदेशमध्ये मोठ्या प्रमाणात एन्काऊंटर केले जात आहेत. यावरुन वादंग उठला आहे. यावर भाष्य करताना केशव प्रसाद मौर्य बोलत होते.

मौर्य यांना रामराज्य म्हणजे चांगले होते असे वाटत असेल तर ते चूक आहे. कारण पुष्यमित्र शुंग हाच खरा राम आहे. याच पुष्यमित्र शुंगाने मौर्य साम्राज्यातील शेवटचा वंशज राजा ब्रहद्रथ यांची हत्या केली आणि त्यानंतर शुंग-शक सुरु झाला. आपल्याला हा इतिहास माहीत असावा, माहीत नसेल तर ते तुमचे अज्ञान आहे.

उत्तर प्रदेशमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अशाप्रकारचे एन्काऊंटर केले जाणार आहे. आमची प्राथमिकता अपराधी लोकांना मारणे आहे. पोलिसांवर हल्ला करणाऱ्या अपराध्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा मौर्य यांनी दिला. योगी सरकारच्या कालखंडात १२४० एन्काऊंटर केल्याचा आरोप आहे. यामध्ये ४० जण ठार झाले तर ३०५ जण जखमी झालेत. सरकारने उचललेल्या या पावलाचे मौर्य यांनी समर्थन केले. दरम्यान याबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने उत्तर प्रदेश सरकारला नोटीस पाठविली. राज्य सरकार आपल्या ताकदीचा दुरुपयोग करत आहे. एन्काऊंटरबाबत विरोधी पक्षांनी आवाज उठविला. यावर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले, ज्यांना बंदुकीची भाषा समजते त्यांना त्याच भाषेत उत्तर देणे आवश्यक आहे.

**संघर्षासाठी मूलनिवासी भारत** या अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखकांच्या लेखामधील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**संघर्षासाठी मूलनिवासी भारत** हे साप्ताहिक मुद्रक, मालक, प्रकाशक आणि संपादक वामन चिंधूजी मेश्राम यांनी छत्रपती प्रिंटर्स, सर्व्हे नं. ०५, ४/३११, केशवनगर, मुंढवा, पुणे - ४११०३६ येथे छापून बामसेफ कार्यालय, ३० भुरे कॉम्प्लेक्स, वैद्यनाथ चौक, नागपूर - ४४०००९ येथे प्रकाशित केले